☏- 02462-244474, 234504
फॅक्स क्रं. - 02462-235103

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

नियंत्रण कक्ष ☏ - 02462-234720
E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

जा.क्रं./ प्रेस नोट / 441 / पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड /2025 / दिनांक : 21 / 11 / 2025

# 1)घरफोडी :-

**भाग्यनगर :-** दिनांक 18.11.2025 रोजी 23.00 वा.ते दिनांक 20.11.2025 रोजी 05.00 चे दरम्यान, **स्नेहांकीत कॉलनी तरोडा बु.व तुळशीराम नगर नांदेड येथे,** यातील अनोळखी तीन चोरटयांनी फिर्यादीचे घराचे कुलूप तोडून आत प्रवेश करून घरातील कपाटातील सोन्या चांदीचे दागीने किंमत 3,51,000 /- रू.व नगदी 50,000 /- रू. तसेच साक्षीदार नामे राजाराम रामचंद्र शिरगिरे, यांचे घरातील नगदी 25,000 /- रू. चा मुद्देमाल चोरून नेले. वगैरे **फिर्यादी सतिश विठ्ठलराव कोल्हे, वय 43 वर्षे, रा. स्नेहांकीत कॉलनी तरोडा बु. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 615 / 2025 कलम 305,331(3),(4),3(5) भारतीय न्याय संहीता-2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि / वाडेवाले, मो. नं. 9975745357** हे करीत आहेत.

# 2)गंभीर दुखापत :

**लोहा :-** दिनांक 17.11.2025 रोजी 13.30 वा. चे सुमारास, **मौ.खांबेगाव ता.लोहा जि. नांदेड येथे,** यातील आरोपी नामे 1.संदीप रामजी पौळ व इतर सात इसम यांनी संगनमत करून यातील फिर्यादी हे ग्रामपंचायतीचे कामामधील भ्रष्टाचार संबधाने पत्रकार प्रतिनिधी म्हणून चौकशी करणे कामी गेले असता फिर्यादीस यापुढे अर्ज करशील चौकशी करशील का असे म्हणून शिवीगाळ करून उजवे पायाचे गुडघ्यास गंभीर दुखापत केली व जिवे मारण्याची धमकी दिली.मारहाण दरम्यान फिर्यादीचे हातातील एक तोळा सोन्याची अंगठी चोरीस गेली.वगैरे **फिर्यादी बालाजी अर्जुन शिंदे, वय 30 वर्षे, व्यवसाय पत्रकार** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे लोहा** गुरनं 358 / 2025 कलम 118(2),189(1),119(1)बीएनएस-2023 कायदा सह कलम प्रसार माध्यम संस्था अधिनियम कलम 3 प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि / सोनकांबळे, मो.नं. 9823867336** हे करीत आहेत.

# 3)फसवणुक :-

**भाग्यनगर :-** दिनांक 18.11.2025 रोजी 10.30 वा. चे सुमारास, **एसबीआय एटीएम राज कॉर्नर नांदेड येथे,** यातील फिर्यादी हे एटीएम मधुन पैसे काढुन मोजत असताना एक अनोळखी इसम याने तुमचे एटीएम कार्ड ब्लॉक होत आहे तुम्ही तात्काळ मिनी स्टेंटमेंट काढा असे म्हणाल्याने फिर्यादीने मिनी स्टेटमेंट काढत असताना एटीएम पिन पाहुन फिर्यादीचे एटीएम कार्ड घेवून दुसरे कार्ड देवून फिर्यादीचे खात्यातून 60,000 /-रु. काढुन घेवून फसवणुक केली.वगैरे **फिर्यादी शंकर मरीबा सावंत वय 85 वर्षे, रा.कल्याननगर नांदेड.** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 613 / 2025 कलम 318(4)बीएनएस-2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि / शिंदे, मो.नं. 9309970858** हे करीत आहेत.

# 4)प्रोव्हिबिशन :-

**हदगाव :-** दिनांक 20.11.2025 रोजी 09.10 वा. चे सुमारास, **जिल्हा परिषद शाळा गेटसमोर हदगाव ता. हदगाव जि. नांदेड येथे,** आरोपी नामे 1.योगेश दिगांबर तिव्हाळे, वय 40 वर्षे, रा. डोंगरगाव 2.तुळशिराम शिंगा राठोड रा. हदगाव हे विना परवाना बेकायदेशिररीत्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमत 15,360 /-रू.चा मुद्देमाल चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने ताब्यात बाळगलेले मिळून आले. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ / 2938 ज्ञानेश्वर भाऊराव जुडे, ने. पोस्टे हदगाव** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हदगाव** गुरनं 398 / 2025 कलम 65 (ई)म.प्रो.का प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ / 2578 सुरकंटे मो.नं. 9112902909** हे करीत आहेत.

## 5)जुगार :–

**अर्धापूर :–** दिनांक 20.11.2025 रोजी 17.00 वा. चे सुमारास, **मौ. कामठा शिवार ता.अर्धापूर जि. नांदेड येथे,** यातील आरोपी नामे 1.रावसाहेब पुरभाजी दवने, वय 51 वर्षे, 2.अजय ज्ञानेश्वर भालेराव, वय 26 वर्षे, रा. अर्धापूर हे विना परवाना बेकायदेशिररित्या मिलन डे नावाचा जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 2380/–रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/2264 गंगाराम हानंमतराव जाधव, ने. स्थागुशा नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापूर** गुरनं 637/2025 कलम 12(अ) म.जु.कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2803 चाटे मो.नं. 9673111588** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड